पत्र

जा.क्र./मृदसं/शेततळे कक्ष/मा.सु / १५९० /२०१६
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय म.रा.पुणे – १
दिनांक - २१ /०६/२०१६.

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक व**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**(कोकण विभाग वगळुन)**

विषय :- मागेल त्याला शेततळे योजना राबविणेबाबत, शेततळयाचे आर्थिक मापदंडाबाबत- काळया मातीतील शेततळे.

संदर्भ :- १) जा.क्र.मृदसं/शेततळे/मासु/मृ-४/४१७/२०१६, दि.२२.०२.२०१६.
२) शासन पत्र क्र./शेतत-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दि.१८.०६.२०१६.

उपरोक्त संदर्भ १ अन्वये दि.१७.०२.२०१६ शासन निर्णयाच्या अनुशंगाने मागेल त्याला शेततळे या योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये १:१ बाजु उतारानुसार व त्याच्या आकारमान निहाय अनुज्ञेय अनुदानाची रक्कम निश्चित करुन देण्यात आलेली आहे. आता संदर्भ २ अन्वये काळया मातीतील शेततळयासाठी १:१ बाजु उतार विचारात घेवुन त्याचे मापदंड निश्चित करण्यात आलेले आहे. योजने अंतगर्त काळया मातीमध्ये १:१.५ बाजु उतार ठेवुन विविध आकारमानाची शेततळी खोदण्यासाठी खालीलप्रमाणे अनुदान देय राहील.

मागेल त्याला शेततळे काळया मातीतील शेततळे बाजु उतार १:१.५.

**तक्ता.**

| अ.क्र | आकारमान(मी) | खोदकामाचे परिमाण (घ.मी.) | शेततळयासाठी येणारा खर्च(रु.) | | अनुज्ञेय अनुदान(रु.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे | इनलेट आऊटलेटसह शेततळे | इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे | इनलेट आऊटलेटसह शेततळे |
| १ | १५ X १५ X ३ | ३५१ | - | १८३१२ | - | १८३१२ |
| २ | २० X १५ X ३ | ५०९ | २१४८० | २४९८० | २१४८० | २४९८० |
| ३ | २० X २० X ३ | ७४१ | ३१२७० | ३४७७० | ३१२७० | ३४७७० |
| ४ | २५ X २० X ३ | ९७४ | ४११०३ | ४४६०३ | ४११०३ | ४४६०३ |
| ५ | २५ X २५ X ३ | १२८१ | ५४०५८ | ५७५५८ | ५०००० | ५०००० |
| ६ | ३० X २५ X ३ | १५८९ | ६७०५६ | ७०५५६ | ५०००० | ५०००० |
| ७ | ३० X ३० X ३ | १९७१ | ८३१७६ | ८६६७६ | ५०००० | ५०००० |

संदर्भ १ च्या मार्गदर्शक सुचनेमधील मुद्दा क्रमांक १२ (७) अनुसार मंजुर आकारमानापेक्षा शेतपरिस्थिती व उतारानुसार खोदकाम करण्यास मर्यादा आल्यास अशा प्रकरणी तालुका कृषि अधिकारी यांनी स्वत: तपासणी करुन कमी आकारमानाचे काम अंतिम करता येईल, तथापि झालेले काम हे इनलेट आऊटलेट सह शेततळयामध्ये किमान काळया मातीतील शेततळयाचे आकारमान नमुद च्या शेवटच्या आकारमानाच्या म्हणजे ३५१ घनमीटर आकारमानाचे व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळयामध्ये किमान ५०९ घनमीटर इतक्या आकारमानाचे खोदकाम करणे आवश्यक आहे.

वर नमुद केलेल्या तक्त्यामधील अनुज्ञेय अनुदान फक्त योजनेअंतर्गत काळया मातीमध्ये १:१.५ बाजु उतार घेवुन विविध मंजुर आकारमानाच्या शेततळयासाठी लागु राहील.

**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-०१.**

**प्रत - मा.उपसचिव नियोजन विभाग रोहयो मंत्रालय, मुंबई – ३२**